सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

---

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०१/०९/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस -३६१६/ प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दिनांक २९ ऑगस्ट, २०२३.

**विषय :-** सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सन २०२३-२४ करीता रु. १३०, ७४,५४,७५३/- इतक्या खर्चास मान्यता देणेबाबत. तसेच सीसीटीएनएस प्रकल्पाचे पुरवठादार मे. विप्रो लि. या कंपनीला यांना विशेषबाब म्हणून सीसीटीएनएस २.० RPF मार्फत नविन पुरवठादारास प्रकल्पाचे काम हस्तांतरीत करेपर्यत मुदतवाढ देणे इत्यादी बाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस -३६१६/ प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दिनांक २९ ऑगस्ट, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०८२९१७२५३३५१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त[illegible]" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सन २०२३-२४ करीता रु. १३०,७४,५४,७५३/- इतक्या खर्चास मान्यता देणेबाबत. तसेच सीसीटीएनएस प्रकल्पाचे पुरवठादार मे. विप्रो लि. या कंपनीला यांना विशेष बाब म्हणून सीसीटीएनएस २.० RFP मार्फत नविन पुरवठादारास प्रकल्पाचे काम हस्तांतरीत करेपर्यंत मुदतवाढ देणे इत्यादी बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३,**
मंत्रालय, २ रा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २९ ऑगस्ट, २०२३

<u>वाचा</u> :- १) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांकः- एमआयएस ०५०८/७४८/प्र. क्र.३२९/पोल-४,दि.२२.०५.२००९.
२) महाराष्ट्र शासन आणि मे. विप्रो लि. यांचे दरम्यान दि.२२.०३.२०१२ रोजी झालेला करारनामा.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील SEC (State Empowered Committee) समितीच्या दि.४.७.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दि.१२.०७.२०१६ व दि.२८.१२.२०१६रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
६) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.१७.०१.२०१७, दि.२०.०७.२०२०, दि. १८.५.२०२१, दि.१६.११.२०२१, दि. १०.५.२०२२ व दि. ४.११.२०२२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
७) शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटीएनएस - ३६१५ / प्र.क्र. २०२ / भाग- ३ / पोल-३, दि.१.७.२०२२ व दि. २१.७.२०२३.
८) राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण केंद्र, केंद्रीय गृह मंत्रालयाचे पत्र क्र. SIB (103) / CCTNS / SPMU / 60 / NCRB - 2001, दि. १७.५.२०१२.
९) राज्य गुन्हे अन्वेषण केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे व मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.लि., यांच्यामध्ये झालेला करार दि. २९.८.२०१२.
१०) माहिती व तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय क्र. GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O Directorate of IT-DIT (MH), दि. १.७.२०१४ व दि. ९.५.२०१९.
११) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-१/पोल-३, दि. १३.६.२०१६.
१२) केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.22011/02/2010-SR/CCTNS P-1, दि. १८.७.२०१६
१३) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-१/पोल-३, दि.१५.१०२०१९ व दि.२६.७.२०२१.
१४) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-२/पोल-३, दि.१४.११.२०२२.
१५) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दि.९.५.२०२२ व दि. १३.१.२०२३.
१६) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.१२.७.२०२३, रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त पत्र दि.२०.०७.२०२३

Scanned with CamScanner

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत राज्यात सीसीटीएनएस प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत सन २०१५ मध्ये राज्यातील १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरिष्ठ पोलीस कार्यालय CAS (Core Application Software) सॉफ्टवेअरव्दारे जोडण्यात आले असून सदर कार्यालयांमध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचे दि.१५.०९.२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते लोकार्पण पार पडले आहे. सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जोडण्यात आलेल्या १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरीष्ठ कार्यालयामध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्प हा केंद्र पुरस्कृत होता परंतु मार्च २०१८ नंतर या प्रकल्पास केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होणार नाही, असे केंद्र शासनाने कळविले आहे. सबब सदर प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींकरीता येणारा खर्च राज्य शासनामार्फत करणे आवश्यक आहे. त्यानुसार सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि. १२.७.२०२३ च्या राज्य शिखर समिती (SAC) च्या बैठकीत सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सन २०२३-२४ करीता रु. १३०,७४,५४,७५३/- इतक्या Committed व Non Committed खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२.७.२०२३ रोजी झालेल्या राज्य शिखर समिती (State Apex Committee) च्या बैठकीत सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सन २०२३-२४ करीता प्रशासकीय मान्यता देणे, मे. विप्रो लि. यांना एक विशेष बाब म्हणून सीसीटीएनएस २.० RFP मार्फत मुदतवाढ देणे सीसीटीएनएस प्रकल्पासाठी राज्य प्रकल्प व्यवस्थापन युनिट (SPMU) म्हणून मे. पीडब्ल्यूसी कंपनीच्या प्रकल्प सल्लागारांना मुदतवाढ देणे, व अन्य बाबी संदर्भात प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने राज्य शिखर समिती (SAC) ने दिलेल्या निर्देशानुसार संपूर्ण प्रशासकीय मान्यतेसाठी फक्त एक शासन निर्णय प्रकाशित करावयाचा असल्याने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

**शासन निर्णय :**

(अ) सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२.७.२०२३ रोजीच्या बैठकीत राज्य शिखर समिती (State Apex Committee) ने दिलेल्या मान्यतेनुसार सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सन २०२३-२४ करीता रु. १३०,७४,५४,७५३/- इतक्या Committed व Non Committed खर्चास मान्यता देण्यात येत असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| No. | Expense Type | Required AMOUNT (INR) |
|---|---|---|
| 1 | Network (2Mbps MPLs, 100 Mbps and 50 Mbps, etc) | 20,69,25,618/- |
| 2 | BSNL's MPLS pending bill till March 2023 | 12,17,49,985/- |
| 3 | SPMU | 1,21,96,008/- |
| 4 | Cloud Service Charges | 85,05,301/- |
| 5 | SMS Service Cost | 50,000/- |
| | **Total (A) (Committed Expenditure)** | **34,94,26,911/-** |

| No. | Expense Type | Required AMOUNT (INR) |
|---|---|---|
| 1 | Cost of CCTNS 2.0 CAPEX | 28,31,35,705/- |
| 2 | One year of Annual maintenance of the CCTNS 1.0 Application. | 9,95,92,000/- |
| 3 | Total (1+2) Including 10% contingency | 42,10,00,476/- |
| 4 | Hardware Procurement | 52,40,27,365/- |
| 5 | Operating System Customization and upgradation | 80,00,000/- |
| 6 | Integration & Customization | 50,00,000/- |
| | **Total (B) (Non-Committed Expenditure)** | **95,80,27,842/-** |
| | **Total (A+B)<br>(Committed + Non-Committed Expenditure)** | **130,74,54,753** |



Scanned with CamScanner

**(ब)** सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल व सेवा करीता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समिती (SAC) ने दि.१२.७.२०२३ रोजीच्या बैठकीत मे. विप्रो लि. यांना एक विशेष बाब म्हणून सीसीटीएनएस २.० RFP मार्फत नवीन पुरवठादारास प्रकल्पाचे काम हस्तांतरीत करेपर्यंत रु.९,९५,९२,०००/- (रुपये नऊ कोटी पंच्याण्णव लाख ब्याण्णव हजार फक्त) इतक्या रकमेच्या खर्चासह मुदतवाढ देण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. (सदर रकमेचा उपरोक्त Non-Committed Expenditure मध्ये समावेश करण्यात आलेला आहे.)

**(क)** मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२.७.२०२३ रोजीच्या राज्य शिखर समिती (SAC) च्या बैठकीत राज्य प्रकल्प व्यवस्थापन युनिट (SPMU) म्हणून मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या एका व्यवस्थापकीय सल्लागारास व दोन वरीष्ठ सल्लागारास दि. १.६.२०२३ ते दि. ३१.५.२०२४ पर्यंत रु. १,२१,९६,००८/- (सदर रकमेचा Committed Expenditure मध्ये समावेश करण्यात आलेला आहे) इतक्या खर्चासह मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(ड)** सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२.७.२०२३ रोजीच्या राज्य शिखर समिती (SAC) बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अपर मुख्य सचिव (गृह) यांना ICJS (Interoperable Criminal Justice System) च्या अंमलबजावणीसाठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. तसेच यानुषंगाने प्रत्येक पंधरवड्याला महाराष्ट्र राज्यातील ICJS च्या पाच स्तंभांच्या नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात यावी.

२. उपरोक्त खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस, (००) १४ गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (राज्य योजना), दत्तमत, (२०५५ए०९७), ५०- इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५, अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अनु क्र.२७-अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला प्राप्त अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०८२९१७२५३३५१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2023.08.30 13:09:55 +05'30'

**( कैलास गायकवाड )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (नि व स), महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned with CamScanner

१०. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अभिलेख कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१७. प्रकल्प संचालक, मे. विप्रो प्रा.लि., मुंबई.
१८. प्रकल्प संचालक, मे. पीडब्ल्युसी कंपनी, मुंबई.
१९. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
२०. कक्ष अधिकारी, अर्थ-१, गृह विभाग.
२१. निवडनस्ती, पोल-३.



Scanned with CamScanner